वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांची सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः विविआ-१०१७/प्र.क्र.९४०/प्रशासन-१

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०१ जानेवारी, २०१८

वाचा :

शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/कार्या.१२, दिनांक.१९.११.२०१६

प्रस्तावना :

गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिका-यांच्या तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचा-यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/पदस्थापना करताना संबंधित प्रकरणी कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावेत या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १९.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती प्राधिकारी घोषित केले आहेत. तसेच गट ब (अरापजत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका /पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी कोण असतील यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांनी पदनिहाय नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम स्वतंत्र आदेशान्वये घोषित करण्याबाबत कळविले आहे. या अनुषंगाने वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांवरील सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील गट ब (अरापत्रित) व गट-क मधील (वाहनचालक वगळता) इतर सर्व पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी हा सामान्य प्रशासन विभाग आहे. त्यामुळे वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट ब (अरापत्रित) व गट-क मधील (वाहनचालक वगळता) इतर सर्व पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी हा सामान्य प्रशासन विभाग असेल.

२. वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-क (वाहनचालक) व गट-ड च्या पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी पुढीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	पदे	नियुक्ती प्राधिकारी
१)	वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील ५२००-२०२०० + १९०० ग्रेड पे या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील **वाहन चालक** या पदावर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे	अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा)
२)	वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील ४४४०-७४४० + १३०० ग्रेड पे या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील **शिपाई** या पदावर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे	अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा)
३)	वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील ४४४०-७४४० + १६०० ग्रेड पे या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील **हवालदार/ नाईक/ आवेष्टक/ झेरॉक्स ऑपरेटर** या पदावर पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे	अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा)

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१०११७४२४९९८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rekha S Kalsekar

Digitally signed by Rekha S Kalsekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed25b1625624e1b981f13909b95f1ca9e2e382c505e6733f3dc4e0289a69195a, serialNumber=01055700341e68a441f756d47c59a2cd2e3cf8dfdbd78941136e7c9b06a36491, cn=Rekha S Kalsekar
Date: 2018.01.01 17:47:56 +05'30'

(रेखा काळसेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजवभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, विधान भवन, मुंबई
५. सर्व मा.संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. प्रबंधक, मूळ शाखा, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१०.प्रबंधक, अपील शाखा, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
११.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई ,
१२.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), मुंबई
१४.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), मुंबई
१५.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकी भवन, मुंबई
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७.महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१८.महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९.महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०.सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
२१.प्रबंधक राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२३.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
२४.अपर मुख्य सचिव (वित्त)/अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा)/प्रधान सचिव (व्यय)/प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक/स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५.सर्व सह/उप/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२६.निवड नस्ती